# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. : ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in

महावितरण

कोल्हापूर परिमंडल,
" विद्युत भवन "२ रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.

क्रमांक : काअ//ग्रातनिमं/अंतरिम केस क्र.०९ /१४-१५/ ४९ दिनांक : २७.०५.२०१४

**आदेश केस क्र.०९/१४-१५**

प्रति,

| | |
|---|---|
| मे.आजरी इंजिनिअरींग प्रा.लि.,<br>प्लॉट नं.जे-१२,एम.आय.डी.सी.,<br>गोकुळशिरगांव, जिल्हा- कोल्हापूर. | अर्जदार |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | विरुध्द पक्षकार |

## अंतरिम आदेश

मे.आजरी इंजिनिअरींग प्रा.लि.,यांचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.नरेंद्र आजरी यांनी आपले प्रतिनिधी श्री.जाविद मोमिन यांचेमार्फत मंचासमोर अनुसुची अ मध्ये १२.०५.२०१४ रोजी वीज वितरण कंपनीविरुध्द तक्रार दाखल केली. ग्राहकाने अंतर्गत कक्षाकडे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. ते वितरण कंपनीचे लघुदाब औद्योगिक ग्राहक आहेत. त्यांचा ग्राहक क्र.२६७७२०१९०३८५ असा आहे. ग्राहकाने आपल्या युनिटचे सर्व विद्युत साहित्य कंपनीच्या बापट कँम्प येथून तपासणी करुन बसविले आहे. वितरण कंपनीच्या कागल उपविभागाच्या ०३.०३.२०१४ च्या पत्रानुसार जानेवारी,२०१० ते ऑगस्ट,१३ या काळात ६३५३३ युनिटसची फरकाची रक्कम रु.४,३२,२००/- ची मागणी केली. ग्राहकाचा मीटर दि.१७.१०.१३ रोजी तपासले असता त्यावर १००X५ असल्याचे आढळले परंतु मीटरवर १५०X५ असे नमुद आहे. दि.१०.०८.२०१३ रोजी चाचणी पथकाने कनेक्शन तपासले असता मीटरवर येणारे मोजमाप व प्रत्यक्षात होणारा वीजवापर यांच्यात तफावत आली. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार बिलाची मागणी केलेली रक्कम बेकायदेशीर व नियमबाह्य आहे. ग्राहकाने कुठलीही जाणूनबुजून चुक केली नाही. वितरण कंपनीने दिलेली १५ दिवसांची नोटीस दिली ती रद्द करावी. मंचासमोरील तक्रारीमध्ये बिलाची रक्कम भरणेस व विद्युत पुरवठा खंडित करु नये अशी मागणी केली. वितरण कंपनीला आपले म्हणणे मांडण्यासाठी नोटीस दिली.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि.२६.०५.२०१४ रोजी घेण्यात आली. ग्राहकाचे प्रतिनिधी श्री.जाविद मोमिन व कंपनीतर्फे श्री.आहुजा व कागल उपविभागाचे सहाय्यक अभियंता श्री.सपाटे उपस्थित होते.

ग्राहक प्रतिनिधी श्री.जाविद यांनी ग्राहकाने विद्युत उपकरणे कंपनीच्या बापट कॅम्प कार्यालयातून तपासली आहेत. सर्व आलेली बिले भरलेली आहेत. वितरण कंपनीची विद्युत पुरवठा खंडित करण्याची नोटीस चुकीची आहे. ॲसेसमेंट दिले नाही. सदरची मागणी ४४ महिन्याच्या फरकाची रक्कम सेक्शन ५६.२ वीज कायद्याच्या तरतुदीविरुध्द आहे. नोटीशीमधील २८.०३ तारखेबाबत हरकत घेतली. नोटीस दिल्यानंतर ती महिन्यांनी बजावली.

वितरण कंपनीतर्फे उच्च दाब वीज कनेक्शनची तपासणी करत असतांना मीटरमधील तफावत दिसून आलीा. बील त्यानुसार देण्यात आले आहे. ग्राहक प्रतिनिधी समक्ष मीटर टेस्टिंग लॅबोरेटरीमध्ये तपासले. ग्राहकाने बील भरणेचे कबुल केल्याने नोटीस उशिरा दिली. नोटीशीमध्ये चुकून २८.०३ अशी तारीख दाखविली. सुनावणी झाल्यानंतर २ वर्षातील फरकाची रक्कम किती होते याचा तपशील देण्यास सांगितले असता ऑगस्ट,११ ते जुलै,१३ ही रक्कम रु.२,६६,०७७/- अशी येते. श्री.जाविद,ग्राहक प्रतिनिधी यांनी २४ महिन्यांची फरकाची रक्कम भरणेस हप्ते द्यावेत अशी मागणी केली.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होतो.

ग्राहकाने मागणी केलेप्रमाणे सदरच्या बिलाच्या रकमेची मागणीस व त्या रकमेपोटी विद्युत पुरवठा खंडित करु नये असे अंतरिम आदेश वितरण कंपनीस देणे कायदेशीर व योग्य होईल का ?

**उत्तर :** होय.

त्यासाठी ग्राहकाने २४ महिन्याची रक्कम वितरण कंपनीकडे भरणे जरुर आहे.

## कारणमिमांसा

ग्राहकाने आपल्या क्ष फॉर्ममध्ये तक्रार अर्जात उपस्थित केलेल्या कारणांचा वितरण कंपनीच्या लेखी अहवालात प्रथम अंतर्गत कक्ष आदेश देईल याबाबत या क्षणी कुठलेही मत व्यक्त करणे योग्य नाही असे मंचाचे मत झालेआहे.

श्री.जाविद यांनी मंचासमोर उपस्थित केलेली व तक्रारीत लिहिलेल्या मुद्यांची सखोल चौकशी तक्रारीच्या सुनावणी दरम्यान होईल.

वितरण कंपनीने फरकाच्या रकमेपोटी ग्राहकाचा विद्युत पुरवठा खंडित करण्याची नाोटीस दिली आहे. परंतु विद्युत कायदा २००३ कलम ५६.२ नुसार वितरण कंपनी केवळ २ वर्षांच्या कालावधीच्या फरकाची रक्कम वसुल करु शकते. इतर रकमेबाबत वेगळे मार्ग अनुसरु शकते.

यावर वितरण कंपनीने मंचाच्या आदेशावरुन २ वर्षाचा तपशील दिला आहे. श्री.जाविद यांनी सदर रक्कम भरण्यास हप्ते द्यावेत असे सांगितले. कारण ग्राहक बिले वेळच्यावेळी भरत आहे. त्याची थकबाकी नाही.

मंचाच्या मते ग्राहकाने सुरुवातीस रु.१,२०,२६६/- दि.२ जून,२०१४ पर्यंत भरावेत. उर्वरित रक्कम रु.१,४०,०००/- दोन समान हप्त्यात म्हणजे प्रत्येकी रु.७०,०००/- येणा-या बिलिंग सायकलप्रमाणे भरावेत. या अटीवर वितरण कंपनीला ग्राहकाचा विद्युत पुरवठा खंडित करु नये असे आदेश देणे योग्य व कायदेशीर होईल.

मुद्दा क्र.१ चे उत्तर **होय** असे देण्यात येते.

## आदेश

१. ग्राहकाचा अंतरिम आदेशाची मागणी वितरण कंपनीविरुध्द मंजुर करण्यात येत आहे.

२. वितरण कंपनीच्या कागल उपविभागाने जर ग्राहकाने २ वर्षाच्या फरकाची रक्कम रु.२,६६,०७७/- पेकी रु.१,२०,०००/- दि.०२.०६.२०१४ पर्यंत व उर्वरित रक्कम दोन समान हप्त्यात प्रत्येकी रु.७०,०००/- दोन बिलिंग सायकलमध्ये भरल्यास ग्राहकाचा दि.२८ मार्च/एप्रिल,२०१४ च्या नोटीशीत सुचित केल्याप्रमाणे मंचाचे पुढील आदेश होईपर्यंत विद्युत पुरवठा खंडित करु नये.

सही/-
(जी. सी. लेले)
ग्राहक सदस्य
ग्रा.त.नि.मंच कोल्हापूर

सही/-
( बी.जी. पवार )
अध्यक्ष
ग्रा.त.नि.मंच कोल्हापूर